# ४७ वर्षांचे स्वराज्य

## डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

१५ ऑगस्ट १९९४ रोजी आपल्या स्वराज्याला ४७ वर्षे पूर्ण झाली. या ४७ वर्षांतली स्वराज्याची वाटचाल विचारात घेतली तर स्वराज्याचे स्वप्न पाहताना "हेच स्वराज्य आपल्याला अभिप्रेत होते काय?" असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. स्वराज्य झाल्याने दारिद्र्याचा प्रश्न सुटेल, निदान त्याची तीव्रता बरीच कमी होईल. भारत अनेक बाबतीत परकीयांवर अवलम्बून न राहता स्वावलम्बी होईल, जगातले एक बलशाली राष्ट्र म्हणून ते ओळखले जाईल अशी बहुतेकांची अपेक्षा होती. तशीच भारताची फाळणी झाल्यावर पाकिस्तान हे मुस्लिम राष्ट्र झाले तसेच भारत हे सहजत:च हिन्दू राष्ट्र होईल अशीही अनेकांची अपेक्षा होती. ही अपेक्षा भारतीयांचीच नव्हती तर १५ ऑगस्ट १९४७ नंतर कित्येक इंग्रजी वृत्तपत्रांनी भारताचा उल्लेख हिन्दुस्तान असाच करायला सुरुवात केली होती.

पण वरील गोष्टींपैकी एकही प्रत्यक्षात उतरली नाही. एवढेच नव्हे तर प्रत्येक बाबतीत त्याच्या विरूद्ध दिशेने झपाट्याने वाटचाल झाली.

"स्वराज्य" झाल्यावर पंचवार्षिक योजनांचा बराच बोलबाला झाला. पण लवकरच लक्षात आले की या पंचवार्षिक योजनांनीच भारताची अर्थव्यवस्था बिघडवून टाकली आहे. भारताचे एक ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ शिनॉय असे म्हणत असत की 'भारताने आपल्या आर्थिक योजना नुसत्या बंद केल्या तर भारताची अर्थव्यवस्था सुधारेल, त्यासाठी दुसरे काही करण्याची जरूर नाही. मध्यन्तरी तीन वर्षे "प्लॅन हॉलिडे" म्हणजे योजनांना सुट्टी देण्यात आली होती, तेव्हा भारताचा विकासाचा दर वाढला होता, यावरून या म्हणण्याचा प्रत्यय आला होता.

असे असता पंचवार्षिक योजनांनी आर्थिक प्रगति केली असा सुशिक्षितात प्रचलित आहे. याचे कारण असे की इंग्रजी शिक्षितांचे भले व्हावे हाच या योजनांचा जाणता वा नेणता उद्देश होता. पदव्युत्तर शिक्षणावर अतोनात भर देण्यात आला. एवढा की २०ते २४ या वयोगटातील ८टक्के लोक पदव्युत्तर शिक्षण घेतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पदव्युत्तर शिक्षण कोणत्याच देशात घेतले जात नाही. पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांच्या रोजगाराची सोय व्हावी म्हणून संशोधन संस्था स्थापण्यात आल्या. त्यामुळे ब्रिटिश काळात सुशिक्षितांची बेकारी हा जो एक बिकट प्रश्न होता तो स्वराज्यात तेवढा बिकट राहिला नाही. शिवाय याच वेळी अमेरिकेला बाहेरील मनुष्यबळाची गरज निर्माण झाल्यामुळे पुष्कळशा सुशिक्षितांना अमेरिकेत लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या. या सर्वांमुळे स्वराज्यानंतरच्या आर्थिक धोरणाचे स्वरूप आपल्याला किती घातक आहे हे सामान्य जनतेच्या लक्षात आहे नाही.

उच्च शिक्षणात झालेली संख्यात्मक वाढ ही अत्यन्त अनुत्पादक होती. देशाच्या गरजेप्रमाणे ही वाढ झाली नसून "विज्ञानाची वाढ केली पाहिजे" या अचिकित्सक समजुतीमुळे ओढूनताणून करण्यात आली. त्यामुळे वैज्ञानिक खात्यांनी मागणी केली नसताही, "तुमच्या खात्याची वाढ करायची आहे तेव्हा तुमच्या विस्ताराच्या योजना प्रस्तुत करा" असे खात्यांना सांगण्यात आले. "सरकारला अमुक काम करवून घ्यायचे आहे ते करण्यासाठी योजना सादर करा" असा हा आदेश नव्हता. तसेच परदेशातून शिकून येणाऱ्या वैज्ञानिकांना नोकरी मिळे पर्यंत वृत्ति देण्याची योजनाही जारी करण्यात आली. म्हणजे देशाच्या गरजेसाठी मानवीय व प्राकृतिक विज्ञान राबविले न जाता वैज्ञानिकांच्या गरजेसाठी देशाची संपत्ती खर्च करण्यात आली. याचा परिणाम असा झाला की देशापुढील प्रश्न सोडविण्यासाठी विज्ञानाचा उपयोग

न होता प्रतिष्ठेच्या वस्तु म्हणून वैज्ञानिकांना पोसण्यात मात्र देशाची संपत्ती खर्च झाली.

**परावलंबी बुद्धी व परावलम्बी तरवार**

याचे एक धवधवीत उदाहरण म्हणजे रक्षाविज्ञानखाते होय. रक्षण सामग्रीत देश स्वयंपूर्ण व्हावा म्हणून हे खाते काढण्यात आले. या खात्यात मोठमोठे पगार घेणारे निदान १०००० वैज्ञानिक असावेत. असे असून इन्स्टिट्यूट ऑफ स्ट्रॅटिजिक स्टडीज या संस्थेचा अहवाल सांगतो की या खात्याचा एकही प्रकल्प कधी पुरा झाला नाही व या खात्याने तयार केलेली एकही वस्तु प्रत्यक्ष वापरात नाही. या खात्याने तयार केलेल्या विजयंता या रणगाड्याचा बराच गाजावाजा करण्यात आला आहे. आजकाल अर्जुन रणगाड्याचा बराच बोलबाला ऐकू येत आहे. पण या रणगाड्याचे एन्जिन जर्मनीकडून घेण्यात आले आहे व अधिक चौकशी करता आणखीही काही काही विदेशी आहे असे कळून आल्याशिवाय राहणार नाही. म्हणजे या रणगाड्यांचा आम्ही किती वापर करावा हे जर्मनी ठरविणार आहे.

तोफा तयार करणे हे मोठे प्रगत विज्ञात नाही. पण आम्हाला बोफोर्स तोफा स्वीडनकडून घ्याव्या लागल्या. याचे समर्थन म्हणून असे सांगण्यात येते ही "आम्ही तोफा सहज करू शकतो, पण तोफा करण्यासाठी स्वतःचा कारखाना काढायचा म्हणजे जरूरीपेक्षा जास्त तोफा केल्याने देशाच्या धनाचा अपव्यय होईल." हे समर्थन कोणाला पटत असेल ते असो, पण हाच आक्षेप स्वतःचे रणगाडे करण्यालाही आहे. या दिशेने झालेले या खात्याचे काम नगण्य आहे असे इन्स्टिट्यूट ऑफ स्ट्रॅटिजिक स्टडीजच्या अहवालावरून स्पष्ट आहे.

केवळ रक्षाक्षेत्रातच नव्हे तर नेहरूयुगात विज्ञानासाठी सर्वच क्षेत्रात जो वारेमाप खर्च करण्यात आला तो वाया गेला असे स्वतः इन्दिरा गांधींनीच एका सायन्स काँग्रेसचे उद्घाटन करताना सांगितले. निरनिराळ्या देशांनी केलेल्या वैज्ञानिक प्रगतीची तुलना करता असे आढळून आले आहे की विज्ञानावर होणाऱ्या खर्चाच्या बाबतीत भारतात नंबर चौथा आहे, तर वैज्ञानिक शोधनिबन्धांच्या बाबतीत तो बारावा आहे. इतर वैज्ञानिकांवर या शोधनिबन्धांचा काय परिणाम झाला वा या "शोधाचा" काही उपयोग झाला की नाही या कसोट्यावर या निबन्धांची गुणवत्ता तपासून पाहता विज्ञानाच्या क्षेत्रात भारताचा नंबर सत्तरावा म्हणजे जवळजवळ शेवटचा लागतो. साऱ्या जगात लहानमोठे मिळून साधारण १५० देश असावेत. या यादीत प्रस्तुत लेखाच्या वाचकांनी ज्यांचे नावकधीही ऐकले नाही असे डझनवारी देश आहेत. तेव्हा विज्ञानाच्या क्षेत्रात सत्तरावा असणारा देश जगातील जवळ जवळ सर्वच देशात मागासलेला आहे असे म्हणण्यात हरकत नाही

या मागासलेपणाचे कारण काय? भारतीयांची वैज्ञानिक बुध्दिमत्ता इतर देशांच्या मानाने कमी आहे असे समजण्यात आधार नाही. निदान ती सत्तराव्या नम्बराची खासच नाही. तेव्हा विज्ञानाच्या क्षेत्रात भारताच्या मागासलेपणाचे खरे कारण तथाकथित "स्वराज्या" मध्ये अवलंबिण्यात आलेल्या स्वत्वशून्य धोरणात आहे. विज्ञानाच्या क्षेत्रात नवीन काम करण्यासाठी स्वत्व म्हणजे स्वतःच्या विचारशक्तीवर निर्णयावर विश्वास असणे अत्यन्त आवश्यक आहे.

**स्वभाषा गमावली, स्वयंप्रज्ञा गमावली**

पण स्वराज्यानंतरची शिक्षणपद्धती व एकूणच प्रचार असा होता की या देशात स्वत्व त्यामुळे सम्पूर्णपणे नाहीसे व्हावे. एक दोन तीन म्हटल्याने आपल्याला गणित येणार नाही. त्यासाठी वन्.टू थ्रीच म्हटले पाहिजे अशा आग्रहाने मातृभाषा माध्यम असलेल्या प्राथमिक शाळातून देखील गणित इंग्रजीतूनच शिकविले जाऊ लागले. ज्या भारतानेच साऱ्या जगाला अंकगणित शिकविले, त्याच्या कोणत्याही भाषेत अंकगणित शिकविण्याचे सामर्थ्य नाही अशा तऱ्हेचे संस्कार लहानपणानपासूनच करण्यात आले. ही झाली मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांची गोष्ट. पण नेहरू युगात मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा या मुळी समाजातल्या तळागाळाच्या वर्गासाठी होत्या. जरा बऱ्या अवस्थेत असलेल्या लोकांसाठी इंग्रजी माध्यम शिशुवर्गापासूनच वापरणाऱ्या, एवढेच नव्हे तर ख्रिस्त सोडून दुसऱ्या कुणाला भजणारे नरकात जातात असे शिकविणाऱ्या शाळा सुरू झाल्या. स्वदेश व स्वधर्म याविषयी पूर्ण तुच्छता निर्माण करण्याचाच हा बुध्दिपूर्वक प्रयत्न होता. अशा शिक्षणातून बाहेर पडलेली स्वत्वशून्य पिढी मर्कटानुकरणाशिवाय दुसरे काय करणार ? स्वतंत्र विचार करून देशापुढील समस्या सोडविण्यासाठी विज्ञानाचा उपयोग करणे असे संस्कार झालेल्या पिढीला शक्यच नव्हते.

स्वभाषेच्या माध्यमावर सुरूवातीपासून भर दिला असता तर विज्ञान ही इंग्रजांची मिरास आहे. विज्ञानाच्या प्रासादात आपले स्थान नोकरचाकरापेक्षा अधिक नाही ही भावना

भारतीयांच्या मनात उदित झाली नसती. स्वभाषेत विज्ञानाची पाठ्यपुस्तके निर्माण करण्याच्या निमित्ताने शास्त्रीय परिभाषेची मूलगामी चिकित्सा व मिळविलेल्या ज्ञानाची व्यवस्थित मांडणी करण्याची सन्धि आमच्या वैज्ञानिकांना मिळाली असती. इंग्रजी माध्यमामुळे तेवढेदेखील निर्मितिपर काम करण्याची त्यांची कुवत उरली नाही. इंग्रजीत स्वतःता पाठ्यपुस्तके निर्माण करण्याऐवजी पाठ्यपुस्तके देखील इंग्रजीभाषी देशातलीच वापरण्याची प्रवृत्ती बळावली. या पाठ्यपुस्तकावर इंग्रजांचा अधिकार असल्यामुळे इंग्रजाचा आपल्या पुस्तकावर अधिकार असल्यामुळे आमच्या शिक्षणाचे नुकसान होते अशी केविलवाणी हाकाटी येथील शिक्षकांनी सुरू केली. ज्यांना विज्ञानाची पाठ्यपुस्तके देखील तयार करता येत नाहीत ते विज्ञानात स्वतन्त्र वाटा कशा काय पाडणार?

आजकाल डंकेल प्रस्थावाविरूद्ध जो प्रचार होत आहे त्याबद्दल श्री शरद जोशी यांनी जे विचार प्रकट केले आहेत ते या सन्दर्भात लक्षात घेण्यासारखे आहेत. आमचा अमेरिकन पेटण्ट कायद्याला विरोध आहे. पेटण्ट कायद्यानुसार एखादा शोध कोणी लावला तर त्या शोधापासून होणारा आर्थिक लाभ त्याच्या परवानगीशिवाय इतर लोकांना घेता येत नाही. पण भारतीय औषधविक्रेते अमेरिकेने केलेल्या औषधाचे पाठ वापरून स्वतःच औषधे तयार करतात व ती विकून नफा कमावतात. ही सरळ चोरी आहे व ही करण्याचा आमचा जन्मसिद्ध अधिकार आहे असे पेटण्ट कायद्याला विरोध करण्याचे स्वारस्य ठरते. तात्पर्य आपण परावलंबी तर आहोतच, त्या उपर त्या परावलंबीपणाचे आपल्याला भूषण वाटू लागले आहे. स्वराज्य म्हणजे स्वावलंबन ही अपेक्षा याप्रमाणे भारतीय स्वराज्याने पूर्णपणे भंगली आहे. आता स्वराज्य म्हणजे समृद्धि या दुसऱ्या अपेक्षेने काय झाले हे पाहू. समृद्धि म्हणजे दरडोई उत्पन्न हा एक निकष आहे. पण याच्याच जोडीला सरासरी आयुर्मान हाही निकष वापरला पाहिजे.

### अल्पायुषी व निरक्षर

कारण देशातल्या एखाद्या लहानशा वर्गाचे फार उत्पन्न असले तर देशातले बहुसंख्य लोक उपाशी मरत असून देखील दरडोई उत्पन्नाचा आकडा मोठा दिसू शकतो. पण सरासरी आयुर्मानाचे तसे नाही. एखादा मनुष्य खूप जगला तरी शंभर वर्षे जगेल. पण असे हजार दोन हजार लोक शम्भर वर्षे जगल्यामुळे देशाचे सरासरी आयुर्मान फारसे जास्त वाढणार नाही. त्यासाठी बहुसंख्य लोकच दीर्घायुषी असले पाहिजेत. माणूस दीर्घायुषी होण्यासाठी त्याला पुरेसे सकस अन्न व थण्डीवाऱ्या पासून रक्षण मिळाले पाहिजे. तसेच त्याला वेळेवर व योग्य औषधोपचार मिळण्याची सोय असली पाहिजे. तसेच तो सामान्यपणे सुखी असलग पाहिजे, कारण सतत दुःखात राहणारा मनुष्य दीर्घायुषी होऊ शकत नाही. तेव्हा सरासरी आयुर्मान हा एकच निकष आपल्याला देशाच्या प्रगतीबद्दल जितकी माहिती देतो तेवढी दुसरा कोणताही निकष देऊ शकत नाही.

याप्रमाणे दीर्घायुष्य व दरडोई उत्पन्न हे दोन निकष वापरले असता, ज्या देशांची नावे सर्वसाधारण सुशिक्षितांना माहीत असतात त्या देशापैकी फक्त नेपाळ व इथियोपिया हे देश भारताहून खालच्या दर्जावर आहेत असे संयुक्त राष्ट्रांचे आकडे सांगतात. म्हणजे केवळ पाकिस्तानच नव्हे तर बांगला देश व श्रीलंका या भारताबरोबर स्वतंत्र झालेल्या देशांची स्थिती भारतापेक्षा चांगली आहे.

आर्थिक स्थितीप्रमाणेच साक्षरतेचे प्रमाण देशाची प्रगति जोखण्यास महत्वाचे समजतात. भारताने स्वराज्यानंतर फक्त उच्च शिक्षणाकडे लक्ष दिले. सरकार व शिक्षण यात इंग्रजी

माध्यमावर भर दिला. लोकांच्या भाषांचा अधिकाधिक वापर व त्यामध्ये सर्व प्रकारचे ज्ञान देणारे वाङ्मय निर्माण करण्याचे कार्य प्रतिगामी ठरवून निरूत्साहित केले व जास्तीत जास्त लोक साक्षर होऊन आपल्या मातृभाषेंतील वाङ्मयाचे वाचन करून बहुश्रुत होतील या दिशेने कोणताच प्रयत्न केला नाही. त्यामुळे भारत हा जगातील सर्वात निरक्षर देश बनला. या शतकाच्या अखेरपर्यन्त जगातील निरक्षरांच्या ५५टक्के निरक्षर भारतात राहणार आहेत असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

अलीकडे भारताची अर्थव्यवस्था जगातील सहावी मोठी अर्थव्यवस्था आहे असा काही तज्ज्ञांचा अंदाज प्रसिद्ध झाला आहे, यावरून भारत हा जगातला सहावा प्रगत देश आहे असा प्रचार करण्यात येत आहे. पण हा सहावा नंबर दरडोई उत्पन्नाचा नसून एकंदर साऱ्या राष्ट्राच्या उत्पन्नाचा आहे. भारताची लोकसंख्या चीन सोडून बाकी सगळ्या देशापेक्षा जास्त आहे, आता ती ऐंशी कोटींच्या घरात आहे. म्हणजे लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसऱ्या असलेल्या देशाचा नंबर अखिल राष्ट्राच्या उत्पन्नाच्या बाबतीत सहावा असणे ही मोठी भूषणावह गोष्ट नाही

याच वर्षी प्रकाशित झालेल्या संयुक्तराष्ट्र विकास कार्यक्रमाच्या अहवालात जगातल्या बहुतेक देशांच्या आर्थिक प्रगतीचा आढावा दिलेला आहे. त्यात मानवी विकास मोजण्यासाठी, दरडोई उत्पन्न, आयुर्मान वगैरे साऱ्या निकषांचा विचार करून एक मानवी विकासगुणांक ठरविण्यात आला आहे. या गुणांकाच्या आधारे प्रत्येक देशाचा क्रमांक निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार भारताचा क्रमांक १३४ वा लागतो. दरडोई उत्पन्नाचा विचार केला तर भारताचा क्रमांक १४६वा लागतो. या सर्व बाबतीत भारताचे शेजारी पाकिस्तान, श्रीलंका व म्यानमार हे भारतावर आहेत. फक्त बांगलादेश भारताच्या खाली आहे.

### लष्करशक्तीची रडकथा !

दरडोई उत्पन्न, आयुर्मान, साक्षरता व स्वावलंबन या बाबतीत भारताची स्थिति इतर देशांच्या मानाने अत्यत शोचनीय आहे तशीच ती लष्करी सामर्थ्याच्या बाबतीत देखील आहे. कोणत्याही देशाची जगात प्रतिष्ठा असण्यात त्याचे लष्करी बळ हे एक अंग महत्वाचे असते. याबाबतीत पाकिस्तानशी भारताची तुलना उद्बोधक होईल. जेव्हा भारत व पाकिस्तान हे दोघेही स्वतंत्र झाले तेव्हा पाकिस्तानजवळ अवघे आठ रणगाडे होते व भारत मनात आणेल तेव्हा पाकिस्तान काबीज करू शकत होता. सरदार पटेलांनी पाकिस्तानात सामिल झालेले जुनागड सरळ सोडवून आपल्या खिशात टाकले व "पूर्वपाकिस्तानातून येणाऱ्या हिन्दू शरणार्थींचा ओघ थांबवा नाही तर आम्ही पूर्व पाकिस्तानात सेना घुसवू" अशी पाकिस्तानला तंबी दिली तेव्हा पाकिस्तानचे पंतप्रधान धावत भारतात समझौता करण्यासाठी आले यावरून पाकिस्तान त्यावेळी भारताच्या मानान किती दुबळे होते हे स्पष्ट होते. पण आज काय परिस्थिति आहे? ६५ सालच्या युद्धात गोळेबन्दी झाली तेव्हा पाकिस्तानच्या सेना भारताच्या हद्दीत होत्या व भारताचा प्रदेश सोडविण्यासाठी आम्हाला ताश्कन्दमध्ये जावे लागले. ७१ चे युद्ध आम्ही रशियाच्या मदतीने जिंकले, पण या युद्धात देखील आमचा काश्मीरमधील

छाम्बचा प्रदेश पाकिस्तानने जिंकून घेतला व तो अजून त्यांच्या कडेच आहे.

आज अशी परिस्थिति आहे की पाकिस्तानजळ नऊ अणुबॉम्ब आहेत असे अमेरिकन हेरखाते म्हणते, या खात्याला भारताजवळ एखादा अणुबॉम्ब असल्याची माहिती नाही. याशिवाय साध्या युद्धात देखील भारत पाकिस्तानचा पराभव करू शकेल अशी परिस्थिति नाही.

श्रीलंकेत तामिळी वाघांचा बन्दोबस्त करण्यासाठी सत्तर हजार फौज पाठवून देखील त्यांचा बन्दोबस्त करता आला नाही व श्रीलंकेने आम्हाला निघून जायला सांगितले. एकूण गेल्या ४६वर्षाचा इतिहास हा सर्वांगीण अध:पाताचा इतिहास आहे असे दु:खान म्हणावे लागते.

याची कारणमीमांसा करण्यासाठी ४६वर्षापूर्वी जे देश भारताप्रमाणेच ब्रिटिश राज्यात होते व ज्यांची परिस्थिति त्यावेळी भारताशी तुल्य किंवा त्यापेक्षा अधिक निकृष्ट होती त्यांनी भारतापेक्षा अधिक प्रगति का केली याचा विचार करावा लागेल, कारण जो देश कधीच परतंत्र नव्हता त्या चीनशी तुलना करणे रास्त होणार नाही. ४६वर्षापूर्वी चीन यादवीने भरडला गेला होता, म्हणजे त्याची दशा भारतापेक्षा फारशी चांगली असण्याचा सम्भव नाही. असे असता आज तो बलाचा विचार केला असता जगातल्या महाशक्तींमध्ये मोडण्यासारखा आहे. सम्पन्नतेत तो मध्यम दर्जाचा आहे, त्याची आर्थिक प्रगति दर वर्षी दहा टक्के आहे तर भारताची केवळ ३.२ टक्के आहे. चीनने ''आम्ही ॲटमबॉम्ब बनविणार तुम्हाला काय करायचे ते करा'' असे जगाला ठणकावून सांगून ॲटमबॉम्बच नव्हे तर हैड्रोजनबॉम्ब व विश्वोड्डाण करणारी अस्त्रे देखील तयार केली आहेत. नुकतेच पाकिस्तानला अस्त्रे पुरविण्याबद्दल अमेरिकेने चीनवर आर्थिक निर्बन्ध घालण्याची धमकी दिली तेव्हा चीनने ''आम्ही तुमच्या आन्तरराष्ट्रीय करारातूनच निघून जातो''असे रोकठोक उत्तर दिले. या सगळ्याची उपपत्ति सरळ आहे. भारतासारख्या गुलामगिरीत राहिलेल्या देशाची चीनसारख्या स्वतंत्र देशाच्या वृत्तीशी तुलना होऊ शकत नाही.

पण आमच्या प्रमाणेच पारतन्त्र्यात असलेल्या पाकिस्तान, म्यानमार व श्रीलंकेने आमच्यापेक्षा जास्त प्रगति का केली?

**देशद्रोहाची पूजा**

या प्रश्नाचे उत्तर शोधायचे असेल तर या इतर देशात प्रचलित नसलेल्या व आमच्या देशात गेली ४६वर्षे अप्रतिहतपणे प्रभावी असलेल्या विचारसरणीचे स्वरूप समजावून घेतले पाहिजे. या वादाची मुख्य वैशिष्टये अशी (१) पाळण्यापासूनचे मुलांचे शिक्षण इंग्रजीतून व्हावे व साऱ्या राज्यकारभाराची भाषा इंग्रजी असावी. सुशिक्षितांना स्वभाषेतून एक दोन तीन देखील मोजता येऊ नयेत. अशा तऱ्हेने शिक्षण घेतलेल्या दोन पिढ्या निर्माण झाल्या आहेत. या पिढ्यांचा या मातीशी व तिच्या इतिहासाशी काहीही सम्बन्ध उरला नाही व स्वार्थापलीकडे पाहायला लावील अशी कोणतीही भावना त्यांच्या मनात नाही. अमेरिकेत जाऊन लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळविणे हे त्यांच्या जीवनाचे इतिकर्तव्य आहे. अशा पिढीकडून भ्रष्टाचार व राष्ट्रद्रोह याव्यतिरिक्त काय अपेक्षित आहे? (२) भारत हे राष्ट्र नसून निरनिराळ्या काळी आलेल्या आक्रमकांचा समूह आहे. त्यामुळे भारतीय राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने शिवाजी व औरंगजेब यांचे स्थान सारखेच. शिवाजीचे पूर्वज औरंगजेबाच्या पूर्वी आले एवढाच फरक. तेवढ्यासाठी आम्ही औरंगजेबाला परकीय आक्रमक मानावे व शिवाजीचे पोवाडे गावे हे समर्थनीय नाही. अशा विचारसरणीचे पोसलेल्या वर्गाला पाकिस्तानने भारत जिंकला तर त्याचे सोयरसुतक वाटायला नको कारण औरंगजेब व शिवाजी सारखे तर अयुबखान व शास्त्री सारखेच का नव्हेत? (३) तिसरा प्रभाव कम्युनिझमला प्रतिष्ठा हा आहे. या तत्वज्ञानाप्रमाणे राष्ट्रबिष्ट्र सर्व झूट आहे, लढा फक्त कामगार व भांडवलदार यात आहे व रशिया वा चीन सोडून बाकीचे देश हे भाण्डवलशाहींचे हस्तक आहेत, या हस्तकात भारताचाही समावेश आहे. त्या मुळे कम्युनिस्ट देशाचे भारतावरील आक्रमण हे आक्रमण नसून विमोचन आहे. यापैकी उजवे कम्युनिस्ट आक्रमण करण्याचा मक्ता फक्त रशियाला आहे असे मानतात, त्यामुळे त्यांनी चीनच्या आक्रमणाचे स्वागत केले नाही. पण डाव्या कम्युनिस्टांनी चीनदेखील भारतावर आक्रमण करण्याचा अधिकार दिला व ६२ साली त्याचे स्वागत केले. केवळ आधुनिक आक्रमणांचे स्वागत हेच कम्युनिझमचे स्वरूप नव्हते, तर दीडशे वर्षापूर्वी झालेल्या व कम्युनिझमच्या जन्मकाळी भारतात दृढ झालेल्या ब्रिटिश आक्रमणाचे देखील सरंजामशाहीच्या पंजातून भारताची मुक्तता करून भाण्डवलशाहीच्या प्रगत युगाकडे भारताला नेणारी शक्ति म्हणून भारतीय ''पुरोगाम्यांनी'' स्वागत केले.

वरील तीन जोखडाखाली वावरणाऱ्या भारताचे कोणत्याही क्षेत्रात पुढे पाऊल पडेल हे शक्यच नव्हते.